# 'कमला 'मध्ये ई-लायब्ररीचा खजिना

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'आजच्या आयटी युगात छापील साहित्याबरोबरच सीडीजद्वारे इतर वाचन साहित्य अमुद्रित स्वरूपात उपलब्ध होत आहे. विद्यार्थिनींनी त्याचा वापर करून आपले ज्ञान अधिक समृद्ध करावे. त्यातून विद्यार्थिनींचा ग्रंथालयाकडे असलेला ओढा निश्चितच वाढेल,' असे प्रतिपादन कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. कॉलेजमध्ये बुधवारी ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथालय सप्ताहानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन केले होते, त्यावेळी ते बोलत होते.

ग्रंथालय सप्ताहानिमित्त ग्रंथालयातील अमुद्रित वाचनसाहित्य विद्यार्थिनी व स्टाफसाठी खुले करण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थिनींना वाचन साहित्यामध्ये निरनिराळ्या विषयांवरील कॅसेट्स, सीडी पाहता आल्या. यामध्ये योगा, स्पर्धा परीक्षा, संगणक, निरनिराळ्या नावाजलेल्या वक्त्यांची भाषणे, पोषण अन्नशास्त्र यांसारख्या विषयावरील सीडीज ठेवण्यात आल्या होत्या. महाविद्यालयीन स्तरावर सर्वांनाच ग्रंथालयातील सर्व सुविधा देणे शक्य नाही, त्यामुळे या समस्येवर मार्ग काढण्यासाठी किमान एक दिवस सर्व विद्यार्थिनींना ग्रंथालय सहल घडवून आणावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमाचे आयोजन ग्रंथपाल ऊर्मिला कदम व सर्व सहकाऱ्यांनी केले. कार्यक्रमास ग्रंथालय समितीचे सर्व सदस्य, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक व सेवक उपस्थित होते.



कमला कॉलेजमध्ये ग्रंथालय सप्ताहानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यावेळी कॅसेट्स, सीडी व वाचन साहित्य पाहताना प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, ग्रंथपाल ऊर्मिला कदम व विद्यार्थिनी.

महाराष्ट्र टाइम्स, कोल्हापूर ■ शनिवार, १३ ऑगस्ट २०१६